ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 8434. Licence No. 58.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १८ सप्टेंबर, १९५५ | अंक ३९

## विविध माहिती

**सहकारी बँकांची संघटना**—गुजरातमधील सहकारी बँकांच्या प्रतिनिधींची एक बैठक अहमदाबादमध्यें भरली होती. ह्या विभागांतील सहकारी बँकांच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं एक मध्यवर्ती संघ काढण्याचें प्रतिनिधींनीं ठरविलें आहे. संघाचें नांव गुजरात को-ऑपरेटिव्ह बँक्स युनिअन असें राहील. ८० समासद्-बँकांच्या नोकरांना संघातर्फें शिक्षणहि देण्यांत येणार आहे.

**जामनगर येथें नवें कॉलेज**—जामनगर येथें श्री. अमृतलाल कालिदास आर्टस कॉलेज काढण्यांत येणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून तें सुरू होईल व गुजरात विद्यापीठाला जोडण्यांत येईल. राजकोट येथील रामकृष्ण आश्रमांत एक वाचनालय उघडण्यांत येणार आहे. वाचनालयासाठीं ७५,००० रुपयांची इमारत बांधण्यांत आली आहे.

**पाकिस्तानचा तागाचा व्यापार**—तागाचा चोरटा व्यापार थांबविण्यासाठीं आणि किंमति स्थिर राखण्यासाठीं पूर्व पाकिस्तानचें सरकार तागाचा व्यापार आपल्या हातीं घेणार आहे. हा व्यापार करण्यासाठीं सरकारला जवळ जवळ ४ कोटी रुपये गुंतवावे लागतील. त्यांपैकीं निम्मी रक्कम पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारकडून मिळणार आहे.

**भंडारदरा येथील धरण**—महाराष्ट्रांतील भंडारदरा-रांधा जलविद्युत् योजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत येणार असल्याचें समजतें. ह्या धरणासाठीं सुमारें २ कोटी रुपये खर्च येईल आणि त्यांवर ३३,००० किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. निर्माण झालेली वीज नाशिक व पूर्व आणि पश्चिम खानदेश आणि नगर जिल्हा इतक्या जिल्ह्यांना पुरेल.

**तेनसिंगचें नवें पुस्तक**—गौरीशिखरावर आरोहण करणारा नेपाळी गिर्यारोहक शेर्पा तेनसिंग लहान मुलांसाठीं आपल्या साहसाची माहिती देणारें पुस्तक लिहीत आहे. गिर्यारोहणांत आलेले सर्व रोमहर्षक अनुभव पुस्तकांत ग्रथित करण्यांत येत आहेत. पुस्तक पुढील वर्षी जगांतील बऱ्याच प्रमुख भाषांतून एकाच वेळीं प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

**कृत्रिम रबराचा कारखाना**—भारतामधील नैसर्गिक रबराच्या उत्पादनास जोड देण्यासाठीं म्हणून कृत्रिम रबर निर्माण करण्याचा एक कारखाना काढण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे. भारत रबराच्या गरजेबाबत स्वयंपूर्ण नसल्यानें कांहीं प्रमाणांत त्याला रबराची आयात करावी लागते. रबराच्या मळ्यांची सुधारणा व विस्तार करण्याची एक योजनाहि सरकारनें तयार केली आहे.

**ब्रह्मदेशाला कर्ज**—भारतीय सरकारनें ब्रह्मदेशच्या सरकारला १० कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें असल्याचें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. त्याशिवाय, ब्रह्मदेशाला भारतांत करावयाच्या खरेदीसाठींहि तितक्याच रकमेचें जादा कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे.

**भूतानला जोडणारे रस्ते**—पूर्व हिमालयांतील भूतान हें राज्य पश्चिम बंगाल व आसाम ह्या राज्यांना जोडणारे, तीन मोटारींचे रस्ते तयार करण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे. सर्व रस्त्यांचें काम पुढील वर्षी हातीं घेण्यांत येईल. भूतानच्या महाराजांच्या सूचनेवरून रस्ते बांधण्याची योजना भारतीय सरकारनें तयार केली आहे.

**औषधी वनस्पतींची लागवड**—पश्चिम बंगाल सरकारनें दार्जिलिंग जिल्ह्यांत औषधी वनस्पतींची लागवड करण्याचें ठरविलें आहे. ह्यासंबंधींच्या शक्याशक्यतेची पहाणी करण्याचें काम पूर्ण झालें असून अहवालहि तयार झाला आहे. लागवडीसाठीं लागणारी जमीन राज्य-सरकार आपल्या ताब्यांत घेऊं लागलें आहे.

**अफगाणिस्तानांतील प्राचीन अवशेष**—अफगाणिस्तानांतील ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या प्राचीन अवशेषांचा व वस्तूंचा अभ्यास करण्यासाठीं भारतीय पुराणवस्तु-संशोधकांचें एक पथक चालू महिन्याच्या अखेरीस त्या देशांत जाणार आहे. ह्या अभ्यासामुळें भारताच्या प्राचीन इतिहासावरहि प्रकाश पडण्यास मदत होईल, असें म्हणतात.

**मांगांच्या व्यवसायाची संस्था**—पाचोरा तालुका हरिजन सेवक संघानें मांग जमात करीत असलेल्या हस्तव्यवसायासाठीं एक सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. संस्थेच्या स्थापनेसाठीं प्रारंभीं १,००० रुपये तरी लागतील.

**वैद्यकीय विद्यापीठ**—बंगालमधील जाधवपूर एंजिनिअरिंग कॉलेजचें रूपांतर तांत्रिक शिक्षणाच्या विद्यापीठांत करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, लवकरच एका नवीन वैद्यकीय विद्यापीठाचीहि स्थापना करण्यांत येणार आहे, असें पश्चिम बंगालच्या विधिमंडळांत सरकारतर्फें सूचित करण्यांत आलें.

**वृत्तपत्रांच्या किंमतींत वाढ**—ब्रिटनमधील कांहीं वृत्तपत्रांच्या किंमतींत वाढ करण्यांत आली आहे. दि न्यूज क्रॉनिकल, दि डेली हेराल्ड व दि डेली मिरर ह्या पत्रांच्या किंमती तीन हापेन्सच्या ऐवजीं दोन पेन्स करण्यांत आल्या आहेत. उत्पादनाच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें ही वाढ करण्यांत आली आहे.

**तांदुळाच्या संशोधनाचें केंद्र**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेती शाखेतर्फे कटक येथें तांदुळाच्या संशोधनासाठी एक केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. संशोधनाबाबत शिक्षण घेण्यासाठी दोघा भारतीयांची निवड करण्यांत आली आहे. त्यांच्याखेरीज सीलोन, जपान, चीन, इंडोनेशिआ, सयाम व फिलिपाइन्स ह्या देशांतून १८ प्रतिनिधी शिक्षणासाठी केंद्रांत येणार आहेत.

**पूरग्रस्तांसाठी मदत**—ओरिसांतील पुरांत निराधार झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी उभारण्यांत आलेल्या फंडाची रक्कम ३,५५,००० रु. इतकी झाली आहे. टाटा कंपनीनें ३०,००० रुपयांची रक्कम दिली आहे. पुरानें नासधूस झालेल्या पाट-बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचीं कामें हातीं घेण्यात आलीं आहेत.

**भारताचें कोळशाचें उत्पादन**—चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतांत १·९१८ कोटी टन कोळशाचें उत्पादन करण्यांत आलें अशी माहिती लोकसभेंत उत्पादनमंत्री श्री. रेड्डी ह्यांनीं सांगितली. ह्याच काळांत भारतामधून २४८ लाख रुपये किंमतीचा कोळसा परदेशीं निर्यात करण्यांत आला.

**रेल्वे वर्कशॉपची पुनर्घटना**—हुबळी येथील रेल्वे वर्कशॉपची पुनर्घटना करण्याची एक योजना सध्यां रेल्वेबोर्डापुढें आहे. योजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत येईल व १९५६-५७ सालांत ती पुरी करण्यांत येईल. पुनर्घटनेसाठी १२५ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.

**मच्छीमारी बोटींची देणगी**—अमेरिकेनें भारताच्या मच्छीमारीच्या धंद्याला मदत करण्यासाठी दोन मच्छीमारी बोटी दिल्या आहेत. प्रत्येक बोट ५७ फूट लांब असून ५० टन वजनाची आहे. अमेरिकन कोळी पॅसिफिक समुद्राच्या किनाऱ्यावर वापरतात, त्या प्रकारच्या ह्या बोटी आहेत. प्रत्येक बोटीला १७ हजार पौंड खर्च आला. त्या नॉर्वेंत बांधण्यांत आल्या.

**ऑल इंडिया मेडिकल कॉन्फरन्स**—इंडिअन मेडिकल असोसिएशनची ३२ वी ऑल इंडिआ मेडिकल कॉन्फरन्स येत्या डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत जयपूर येथें भरविण्यांत येणार आहे. इतर विषयांबरोबरच, आधुनिक वैद्यकांत आयुर्वेदाचें स्थान, ह्या विषयावरहि अधिवेशनांत चर्चा करण्यांत येणार आहे.

**त्रावणकोर-कोचीन राज्याचा जमाखर्च**—त्रावणकोर-कोचीन राज्यसरकार एक रेव्हेन्यू कमिशन नेमण्याचा विचार करीत आहे. राज्याच्या जमाखर्चाची पहाणी-तपासणी करून उत्पन्न अधिक वाढविण्याच्या सूचना कमिशननें करावयाच्या आहेत. खर्चावर योग्य नियंत्रण ठेवून राज्याची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी असें कमिशन नेमण्याची सूचना कर-चौकशी मंडळानें केली होती.

**पोलादाची आयात**—देशांतील एंजिनिअरिंगच्या धंद्याला भासणारी पोलादाची तूट भरून काढण्यासाठी भारतीय सरकारनें १९५५-५७ ह्या तीन वर्षांत दरसाल १० लाख टन पोलादाची आयात करण्याचें ठरविलें आहे.


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्रा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.
* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२९५
तार-SANCOSOP
वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.
ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २८ सप्टेंबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वाढत्या लोकसंख्येचें आव्हान

भारताच्या नियोजित अर्थव्यवस्थेच्या धोरणाला व कार्यक्रमाला वाढती लोकसंख्या हें गंभीर स्वरूपाचें आव्हान आहे. २० वें शतक संपण्याच्या सुमारास, लोकसंख्येची वाढ सध्यांच्या वेगानेंच होत गेल्यास, भारताची लोकसंख्या ६० कोटी होईल आणि चीनची १०० कोटी होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारताच्या नियोजन समितीला ह्याची जाणीव नाहीं, असें नाहीं. औद्योगिक प्रगतीचा सध्यांचा वेग लोकसंख्येच्या वाढीपेक्षा कांकणभर अधिकच आहे. त्यामुळें लोकांना कामधंदा देण्याचे प्रयत्न सफल होण्याची शक्यता बेताचीच आहे. कारण, दरवर्षी काम मागण्यासाठी हजारों नवीन माणसें तयार होत आहेत. समितीनें असा अंदाज केला आहे कीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचीं उत्पादनविषयक उद्दिष्टें गांठण्यांत आलीं, तरीसुद्धां योजनेच्या अखेर ग्रामीण भागांतील बेकारी ३२ लाखाइतकी वाढलेली असेल आणि शहरांतील बेकारी सुमारें २० लाखाइतकी तरी शिल्लक राहील. पुढील पांच वर्षांत, काम करण्यास योग्य अशा १० लाख लोकांची नवीन भर पडणार आहे. गेल्या जानेवारींत नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या स्थायी समितीची पहिली बैठक भरली होती. त्यावेळीं ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून कुटुंब–नियोजनाची चर्चा करण्यांत आली. तथापि, कुटुंबनियोजनाविषयक कांहीं उपाययोजना करण्यांत आली तरीसुद्धां कांहीं वर्षें त्यांचा उपयोग झालेला विशेषसा दिसणार नाहीं असें मत व्यक्त करण्यांत आलें. ह्या महत्त्वाच्या प्रश्नाची देशभर जाणीव करून देण्यांत यावी आणि कुटुंबनियोजनाच्या पद्धतीची माहिती करून देण्याची व्यवस्था करावी, हें मात्र मान्य करण्यांत आलें.

---

## छापखान्याच्या शिक्षणाच्या शाळा

कलकत्ता येथील ' अमृत बझार ' ह्या दैनिकाचे संपादक श्री. तुषार कांति घोष ह्यांनीं वेस्ट बंगाल प्रिंटर्स कॉन्फरन्सचें उद्‌घाटन कांहीं दिवसांपूर्वी केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं आधुनिक छापखान्याचा व्यवहार बराच गुंतागुंतीचा असतो. त्यामुळें कोणत्याहि एका व्यक्तीला छापखान्याच्या निरनिराळ्या खात्यांचें नीटसें ज्ञान असणें शक्य नसतें. ह्या धंद्यांत अनेक प्रकारच्या ज्ञानाची गरज लागते व तें मिळविण्यासाठीं शिक्षण घ्यावें लागतें. धंद्यांतील एखाद्या विवक्षित कामाची ज्यांना विशेष माहिती आहे, त्यांनीं छापखान्याचें शिक्षण देणाऱ्या शाळा काढण्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावें. अशा शाळांतून तरूण लोकांना थोड्या खर्चांत योग्य तें शिक्षण देतां येईल. भारतीय सरकारनें ह्या धंद्याचें शिक्षण देणाऱ्या शाळा काढण्याचा निर्णय घेतला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. स्वागत समितीचे अध्यक्ष, श्री. अशोककुमार सरकार, म्हणाले कीं ह्या धंद्यांत कलकत्त्यांत व हौऱ्यांत मिळून १ लाख लोक काम करीत आहेत. केवळ अधिक लोकांना काम देण्याच्या दृष्टीनें सुद्धां सरकारनें ह्या धंद्याला उत्तेजन दिलें पाहिजे. सध्यां भारत दरवर्षी सुमारें २॥ कोटी रुपये किंमतीचीं छापण्याच्या धंद्याचीं परदेशी यंत्रें आयात करतो. हीं यंत्रें देशांत तयार करतां येण्यासारखीं असल्यानें त्यांची निर्मिति करण्याचें ठरविल्यास बऱ्याच लोकांना रोजगार मिळेल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २५० कोटी रुपयांची रक्कम निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामुग्री निर्माण करण्याचे कारखाने उभारण्यासाठी खर्च करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या रकमेपैकीं कांहीं भाग छापखान्याचीं यंत्रें तयार करण्यासाठीं भारतीय सरकारनें राखून ठेवला, तर चांगलें होईल.

---

## बोट–कंपन्यांना दिलीं जाणारीं कर्जें

भारतामधील बोट–कंपन्यांचें सध्यां तरी राष्ट्रीयीकरण करण्यांत येणार नसलें तरी ह्या कंपन्यांना आपला पसारा वाढविण्यासाठी सरकारी कर्जांवर अवलंबून रहावें लागतें. त्यामुळें ह्या कंपन्यांवर अंशतः तरी सरकारचें नियंत्रण बसतें. ज्या कंपन्या सरकारकडून कर्ज घेतात त्यांच्या संचालकमंडळांवर सरकारचे डायरेक्टर्स नेमण्यांत येतात. कंपन्यांच्या कारभारावर नजर ठेवण्याचें त्यांचें काम असतें. सरकारनें दिलेल्या कर्जाच्या साह्यानें ज्या नवीन बोटी विकत घेण्यांत येतात त्या संबंधित बोटी सर्व कर्ज फिटेपर्यंत सरकारकडे गहाण टाकण्यांत येतात. कर्जाची फेड १४ वर्षांत हप्त्याहप्त्यानें करावयाची असते. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सरकारनें बोट–कंपन्यांना कर्जें देण्यासाठीं म्हणून बरीच मोठी रक्कम मंजूर केली होती. ह्या रकमेपैकीं १८ कोटी रुपये शिंदिया, इंडिअन स्टीमशिप, भारत, मलबार स्टीमशिप व इतर कांहीं कंपन्यांनीं घेतला आहे. त्याशिवाय ग्रेट ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन आणि ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन ह्या सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या कंपन्यांनाहि कर्जें देण्यांत आलीं आहेत. शिंदिया कंपनीखेरिज इतर कंपन्यांच्या बोर्डांवर सरकारी डायरेक्टर्स नेमण्यांत आले आहेत. शिंदिया कंपनीवरहि सरकारी डायरेक्टर्स लवकरच नेमण्यांत येणार आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत दर्यावर्दी वाहतुकीच्या बोटींत वाढ करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. १९५५–५६ मध्यें व्यापारी वहातूक करणाऱ्या बोटींचें वजन सुमारें ६,००,००० टन आहे तें योजनेअखेर १०,००,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येईल. त्यासाठीं ८० कोटी रुपये खर्च येईल. पण सुमारें ७० कोटी रुपये सरकारच खर्च करणार आहे असें समजतें.

---

## रिझर्व्ह बँक व विद्यापीठें

भारतांतील कांहीं विद्यापीठांत आर्थिक विषयांच्या अभ्यासासाठीं कांहीं ' आसनें ' ठेवण्यासाठीं देणग्या देण्यास रिझर्व्ह बँकेनें मान्यता दिली आहे. त्यानुसार, इंडस्ट्रियल फायनान्स या विषयाचें ' आसन ' कलकत्ता विद्यापीठांत ठेवण्यांत येईल. अशा प्रत्येक आसनासाठीं प्रतिवर्षी २५,००० रुपये, याप्रमाणें पांच वर्षें देणगी देण्यांत येईल.

# दुसरी पंचवार्षिक योजना

—२—

१०. देशांत करण्यांत आलेल्या जमीनसुधारणेचा अप्रत्यक्ष प्रयत्न वगळतां पहिल्या पंचवार्षिक योजनेंत उत्पन्न व संपत्ति यांतील विषमता कमी करण्यांत विशेष प्रगति झाली नाहीं. समाजवादी रचनेंत ही विषमता कमी करून मानवी कष्टांची समतोल वांटणी करणें अत्यावश्यक आहे. अशा स्वरूपाच्या या तफावती आर्थिक जीवनांतील सर्व क्षेत्रांत असून त्यांचा विचार करावाच लागेल. हा विचार केवळ जमीन, सरकारी नोकरांचे पगार, इतक्यापुरताच करावा लागणार असें नसून तो खासगी व्यापार व उद्योगधंदे याबाबतहि करावा लागेल. प्रत्येक प्रकरणीं प्रगतीचा वेग आणि स्वीकारलेल्या पद्धती सारख्याच नसल्या तरी समानतेच्या पायावर अधिष्ठित असा समाज अल्पावधींत घडविण्यासाठी समान व सुसूत्र असा दृष्टिकोन असला पाहिजे. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योजावयाच्या विधायक व अकरणात्मक अशा दोन्ही स्वरूपाच्या उपायांची आखणी तपशीलवार केली पाहिजे. कारण सध्यां हा हेतु अशा सर्वसामान्य स्वरूपांत व्यक्त करण्यांत येतो कीं त्यामुळें तो साध्य करण्यास निश्चित स्वरूपाची कृति बेतानींच होत असते.

### स्थानिक पुढाकारास महत्त्व

११. भारतांत आपण सत्ता व उपक्रम यांचें विकेंद्रीकरण साधणें आणि अगदीं सामान्य माणूस आणि खेड्यांतील जनता यांचे हितसंबंध राखण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या स्वरूपाच्या सामाजिक व आर्थिक संस्था निर्माण करणें या कल्पनांचा समावेश असलेली अशी समाजवादी स्वरूपाची समाजरचना समोर ठेवली आहे. मोठे उद्योगधंदे आणि आधुनिक तंत्रविद्या यांमुळें अन्य देशांतील समाजवाद सत्तेच्या व साधनसामुग्रीच्या केंद्रीकरणाकडे झुकला असून तेथें कित्येक प्रकारच्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडत आहेत. असे हे धोके असून आपणांस लोकशाही पद्धतीचा व सर्वोदय दृष्टिकोनाचा विकास साधावयाचा असल्यास आपण काळजी घेतली पाहिजे. व्यापक स्वरूपाच्या राष्ट्रीय चौकटींत स्थानिक पुढाकार आणि निर्णयास वाव असलेली आर्थिक पद्धति निर्माण केल्यानंतरच आपणांस आपल्या आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांत समतोल साधतां येईल.

### आर्थिक पार्श्वभूमि

१२. पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील प्रमुख आर्थिक लक्ष्यें गांठण्यांत आपणांस जें यश लाभलें त्यामुळेंच बहुशः आपल्या अर्थव्यवस्थेस दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणखी बऱ्याच गोष्टी साधतां येतील. १९५१–५६ या पांच वर्षांत विकास-कार्यावरील एकूण खर्च सुमारें २,००० कोटी रुपये होईल. शेतकी क्षेत्रांत बरीच प्रगति साधण्यांत आलेली आहे. धान्योत्पादन योजनापूर्व-पातळीपेक्षा १९५३–५४ मध्यें ११० लक्ष टनांनीं वाढलें आणि कापसाचें उत्पादन १० लक्षांवर गांसड्यांनीं वाढलें आहे. पाटाच्या पाण्याखालील क्षेत्र ७० लक्ष एकरांनीं आणि विजेचें उत्पादन १·२ दशलक्ष किलोवॅटनीं वाढणार आहे. औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १९५० मध्यें १०५ होता तो वाढून १९५४ मध्यें १४६ व फेब्रुवारी १९५५ मध्यें १५८ वर गेला. ही वाढ प्रामुख्यानें कापड, सिमेंट आणि साखर या धंद्यांत व इतर अनेक क्षेत्रांत दिसून आली व विकास घडून आला. एकंदरीनें पाहतां अनेक उणीवा असूनहि वाहतूक व्यवस्थेंत बरीच सुधारणा झाली.

### न वापरलेली साधनसामुग्री

१३. या अनुकूल घडनांचा विचार करीत असतांनाच याच कालावधींत बेकारीचें प्रमाणहि वाढलें असून अलिकडेच शेत-मालाच्या किंमती घसरत असल्याचीहि चिन्हें दिसूं लागलीं आहेत हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. राहणीमानाचा दर्जा बऱ्याच प्रमाणांत उंचविला जाण्याच्या दृष्टीनें आजपर्यंतचा विकासाचा वेग पुरेसा नाहीं हें म्हणणें नाकारतां येणार नाहीं. ह्या देशांत वापर न केलेली साधनसामुग्री, विशेषतः मनुष्यबळ बरेंच असून सुप्त साधनसामुग्रीहि बरीच मोठी आहे. दिलेल्या मुदतींत विकास किती साधतां येईल हें समाजाची बचत कशा प्रकारें एकत्रित करण्यांत येतें व त्याची अंगभूत साधनसामुग्री कशी वापरली जाते यावर अवलंबून राहील. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याचें आपलें उद्दिष्ट भांडवल उभारणीच्या प्रमाणांत वाढ करण्याच्या आपल्या कुवतीवर अवलंबून आहे. १९५०–५१ मध्यें भांडवलउभारणीचें निव्वळ प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६·२ टक्के असून त्यानंतरच्या दोन वर्षांत तें ६·७ टक्के व १९५३ मध्यें ६·८ टक्के होतें. दुसऱ्या शब्दांत म्हणजे, आपल्या उपरिनिर्दिष्ट साधनसामुग्रीपैकी राष्ट्र या दृष्टीनें पुरेसा वांटा भांडवल गुंतविण्यांत जात नाहीं. १९५०–५१ ते १९५३–५४ या मुदतांत निव्वळ राष्ट्रीय उत्पादनांत १२ ते १३ टक्क्यांनीं वाढ झाली परंतु त्यापैकी सुमारें निम्मी वाढ शेतकी क्षेत्रांत दिसून आली. विकास साधण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचाच केवळ तो परिणाम नसून सुदैवानें लाभलेल्या अनुकूल हंगामाचाहि तो परिणाम होय. वाढत असलेली लोकसंख्या विचारांत घेतां दर माणशीं उत्पादनाचें प्रमाण चार वर्षांच्या अवधींत अवघें ८ टक्क्यांनीं वाढलें. लोकसंख्येंतील वाढ अर्थव्यवस्थेवर वाढत्या प्रमाणावर बोजा टाकीत आहे आणि भारताची लोकसंख्या १९७१ पर्यंत ४५·३ कोटी आणि १९८१ पर्यंत अंदाजें ५१·६ कोटींपर्यंत जाईल ही गोष्टहि जाणून घेतली पाहिजे.

---

## अमेरिकेंतील शास्त्रीय संशोधनास कारखानदारांचा मोठा हातभार

अमेरिकेंतील कित्येक कंपन्यांच्या मालापैकी बराच माल त्या १० वर्षांपूर्वी उत्पादन करीत नव्हत्या व त्यांच्या नफ्यापैकी ४०% नफा नव्या उत्पादनांतूनच मिळतो, असें आढळून येतें. कारखान्यांत गुंतविलेल्या भांडवलास स्पर्धेची झळ लागूं नये, उत्पादन अधिक कार्यक्षमतेनें व किफायतशीर व्हावें व उत्पादनाचे उपयोग वाढत जावे, ह्या दृष्टीनें कंपन्या संशोधन करीत असतात. त्याचप्रमाणें, नव्या जिनसांच्या उत्पादनाचे बाबतींतहि संशोधन चालू असतें. पहिल्या प्रकारचें संशोधन 'विम्या'च्या स्वरूपाचें, तर दुसऱ्या प्रकारचें संशोधन 'गुंतवणुकी'च्या स्वरूपाचें म्हणतां येईल. अमेरिकेंत संशोधनावर होणारा खर्च एकसारखा वाढतच चालला आहे. चालू वर्षी ह्या खर्चाचा आंकडा ४०० कोटी डॉलर्स एवढा होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. १९४१ मध्यें संशोधनावर जेवढा खर्च करण्यांत आला होता, त्याच्या ३४५% ज्यास्त ही रक्कम आहे. १९५५ मध्यें अमेरिकेंतील एकूण शास्त्रीय संशोधनापैकी ७०% संशोधन खासगी कंपन्या करतील; गेल्या वर्षी हें प्रमाण ६८% होतें. बाकीचें संशोधन सरकारी, कॉलेजांच्या व विद्यापीठांच्या प्रयोगशाळांतून होतें. विमानें, विजेचीं यंत्रें व साहित्य, रसायनें, पेट्रोल, इत्यादींचें उत्पादन करणारे कारखानेच ह्या संशोधनांतील मोठा भाग उचलतात.

### दुर्गापूर येथें पोलादाचा तिसरा कारखाना

भारतीय सरकारनें सरकारी मालकीचा तिसरा पोलादाचा कारखाना पश्चिम बंगालमधील दुर्गापूर ह्या ठिकाणीं काढण्याचें ठरविलें आहे. कोलंबो मदत-योजनेप्रमाणें ब्रिटिश कारखानदारांचें प्रतिनिधीमंडळ भारतांत आलें होतें. मंडळानें निरनिराळीं ठिकाणें पाहून आपला अहवाल सरकारला सादर केला होता. आतां दुर्गापूर येथें काढण्यांत यावयाच्या कारखान्याविषयीं अधिक चर्चा करण्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत येणार आहे. पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री डॉ. रॉय राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधीं नियोजन-समितीशीं सल्लामसलत करण्यासाठी दिल्लीला गेले होते; त्यांनीं दुर्गापूर हें ठिकाण निश्चित झाल्याची माहिती पत्रकार-बैठकींत सांगितली. राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधीं ते म्हणाले कीं, विकासात्मक कार्यासाठी योजनेंत ३४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत येत आहे. तथापि ही रक्कम ४०५ कोटी पर्यंत वाढविण्याचाहि संभव आहे. राज्यांत हातीं घेण्यांत येणाऱ्या प्रमुख मोठ्या कामांसाठी ५७ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत त्यांपैकी गंगा नदीवरील कामांसाठी ३० कोटी रुपये खर्च होतील. पण ही सर्व रक्कम मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नांतून खर्च करण्यांत येणार आहे. उरलेलीं मोठीं कामें राज्य-सरकार आपलें स्वतंत्र विकास-खातें काढून करणार आहे. ह्या कामांसाठी लागणारी २७ कोटी रुपयांची रक्कम राज्य-सरकारच पुरविणार आहे. डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला आपलें काम सुरू करतां यावें म्हणून सरकार ६·५ कोटी रुपये देणार आहे. बंगालचें सरकार पंचवार्षिक योजनेसाठी आपल्या उत्पन्नांतून ९० कोटी रुपये देऊं शकेल. मध्यवर्ती सरकारनें फक्त २९·५ कोटी रुपयांचा अंदाज केला होता.

---

### अहमदाबाद कॉर्पोरेशनची सरकारला विनंति

अहमदाबाद कॉर्पोरेशनच्या बोर्डानें एक ठराव मंजूर करून मुंबई राज्य सरकारला अशी विनंति केली आहे कीं, कॉर्पोरेशनच्या हद्दींत असणाऱ्या स्थावर मालमत्तेवर जो कर वसूल करण्यांत येतो तो जनरल टॅक्सचा एक भाग म्हणून वसूल करण्याची परवानगी देण्यांत यावी. कर-चौकशी-समितीनें हा कर स्थानिक संस्थांच्याकडे वर्ग करण्यांत यावा अशी शिफारस केली असल्याचेंहि ठरावांत सरकारच्या निदर्शनास आणण्यांत आलें आहे. हा फरक पांच वर्षांच्या अवधींत हळुहळू करण्यांत यावा असेंहि सुचविण्यांत आलें आहे. ह्या विषयासंबंधीं बोर्डाच्या सभेला माहिती देतांना म्युनीसिपल कमिशनर श्री. एम्. डी. राजपाल म्हणाले कीं, कॉर्पोरेशनच्या हद्दींतील मोकळ्या जागेवर गेलीं चार वर्षें कर वसूल करण्यांत येत आहे. ह्या कराच्या आकारणीमुळें कॉर्पोरेशनला ६२ लाख रुपयांचें उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. वरील अंदाजी रकमेपैकी आतांपर्यंत सुमारें अकरा लाख रुपयांपेक्षा थोडी अधिक रक्कम वसूल करण्यांत आली आहे. मोकळ्या जमिनीवर अशा प्रकारचा कर वसूल करण्याच्या कॉर्पोरेशनच्या हक्काला मुंबई हायकोर्टानें आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. परंतु ह्या प्रकरणासंबंधी सुप्रीम कोर्टापुढें अपील करण्यांत आलें असून त्याचा निकाल अद्याप लागलेला नाहीं. तथापि तो निकाल लागेपर्यंत कर वसूल करण्याचें काम कॉर्पोरेशनला लांबणीवर टाकतां येणें शक्य नाहीं. मोठमोठ्या शहरांतून कराव्या लागणाऱ्या सुधारणांसाठी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांना उत्पन्नाच्या अधिक बाबी शोधाव्या लागतात, त्याचाच हा पुरावा आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

**दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर




## मुंबई राज्यांत सहकारी तत्त्वावर शेतमालाची विक्री

शेतकऱ्याला त्याच्या मालाची चांगली किंमत मिळावी आणि बाजारभावांतील अनिष्ट चढउताराचे वेळीं स्वार्थी व्यापाऱ्यांकडून त्याची पिळवणूक होऊं नये हा सहकारी विक्री संस्था स्थापन करण्यामागील आणि लायसेन्स देऊन वखारी स्थापन करण्याबाबत सरकारनें केलेल्या तरतुदीमागील हेतु आहे. वखारींमुळें शेतकऱ्याला त्याच्या मालाचा संग्रह करतां येतो आणि बाजारभावांतील चढउतारामुळें तो कमी किंमतीला विकून टाकण्याची त्याच्यावर पाळी येत नाहीं. तसेंच सहकारी तत्त्वावर शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था केल्यामुळें गिऱ्हाइकांच्या हितसंबंधांचेंहि रक्षण केलें जातें. आतां प्रतवारीची पद्धत सुरू करण्याच्या दृष्टीनें आणि मालाच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत.

मुंबई राज्यांत एकूण दीड लाख सभासद असलेल्या ३३१ सहकारी विक्री संस्था आहेत. या सर्व विक्री संस्थांचें खेळतें भांडवल ४४३ लाख रुपयांवर आहे. या सोसायट्यांची उलाढालहि भरपूर होत असून गेल्या वर्षी त्यांनीं १३·६० कोटी रुपयांचा शेतमाल हाताळला. हा शेतमाल विविध प्रकारचा होता.

गुजरात आणि कर्नाटकांतील कपास विक्री संस्था भरपूर धंदा करीत आहेत. सुरत, भडोच आणि धारवाड या जिल्ह्यांतील संस्था बाजारांत येणाऱ्या कपाशींपैकी सुमारें २५ टक्के कपास हाताळतात. सुरत, अहमदाबाद आणि पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सोसायट्या फळांचा व्यापार करतात. दख्खन कालव्याच्या प्रदेशांतील कोल्हापूर आणि नाशिक जिल्ह्यांतील खरेदी-विक्री संस्था गुळाच्या एकूण व्यापारापैकीं सुमारें १५ टक्के व्यापार करतात.

राज्यांतील सहकारी तत्त्वावर शेतमालाची विक्री करण्याच्या पद्धतीचें भवितव्य उज्ज्वल असून त्यासाठी सहकार खात्यानें आपला शेतमाल विक्री विभाग अधिक भक्कम केला आहे. यासाठी आवश्यक ती योजना आंखण्यांत आली असून ती अंमलांत आणण्यांत येत आहे. शेतमालाची सहकारी तत्त्वावर विक्री करण्याच्या कार्याचा विकास होण्याच्या दृष्टीनें सहकार खात्यातर्फे करण्यांत येणाऱ्या कामाची थोडक्यांत माहिती येथें देण्यांत येत आहे.

### लायसेन्स दिलेल्या वखारी आणि प्रतवारीची व्यवस्था

वखारी बांधण्यासंबंधींचें बिल यापूर्वीच मंजूर झालें असलें तरी प्रत्यक्ष वखारी बांधण्याचें काम मात्र अलिकडेच हातीं घेणें शक्य झालें. अशा प्रकारच्या वखारी बांधण्याचें काम हातीं घेणाऱ्या विक्री संस्थांना कर्जे देण्यासाठी सरकारनें २,९२,००० रुपये मंजूर केले. हल्लीं अशा प्रकारच्या एकूण ८ वखारी असून त्यांतील तीन तर अगदीं अलिकडेच बांधण्यांत आल्या आहेत. परंतु केवळ लायसेन्स दिलेल्या वखारी बांधून काम भागण्यासारखें नाहीं. कारण, आपले शेतकरी फक्त त्यांच्या उदरनिर्वाहापुरतीच शेती करीत असल्यामुळें बाजारांत विकावयास त्यांच्याकडे शिलकी मालच नसतो. शिवाय, सहकारी तत्त्वावर विक्री करण्याच्या पद्धतीचा विकास झाला पाहिजे व सुगीनंतर शेतमालाच्या किंमती वाढल्या पाहिजेत.

शेतमालाची चांगल्या प्रकारें विक्री होण्यासाठी मालाची प्रतवारी लावणें आवश्यक असते. ताग, तंबाखू, लोंकर आणि केस या मालाची परदेशांत निर्यात होते तेव्हां त्याची प्रतवारी लावली पाहिजे असा कायदा असून भारत सरकारचे चीफ मार्केटिंग ऑफिसर यांचें प्रतवारीवर नियंत्रण असतें.

पण खरें म्हणजे व्यापाऱ्यांकडून आणि ग्राहकांकडून अधिक चांगल्या मालाला वाढत्या प्रमाणावर मागणी आली पाहिजे. तेलें, तूप आणि लोणी यांचीहि आतां प्रतवारी लावण्याचें ठरलें असून तेलें व तूप यांचें उत्पादन होणाऱ्या महत्त्वाच्या केंद्रांतून एकूण पांच प्रयोगशाळा स्थापन करण्याच्या योजनेचा सरकार सध्यां विचार करीत आहे. परंतु उत्पादकांनीं आणि ग्राहकांनीं मालाची प्रतवारी लावून मालाच्या दर्जावर नियंत्रण ठेवलें पाहिजे. उत्कृष्ट मालाला अधिक किंमत पडतें हें ग्राहकांनीं लक्षांत घ्यावें आणि ती देण्याची तयारी दाखवावी.

कर्जे देऊन सरकार बाजारपेठा स्थापन करण्यास मदत करीत आहे. तसेंच, यासाठी पडीत जमीन मोफत देण्यांत येतें आणि बिगर-शेतकी सारा देण्याच्या बाबतींतहि सूट देण्यांत येते. बाजारपेठा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाची एक बाब असून ज्या शेतमाल विक्री समित्या बाजारपेठा चालवीत असतील त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अधिक सवलती मिळवून देण्यासाठींहि खास प्रयत्न करण्यांत येत आहेत.

### वाहतूक व्यवस्थेचा विकास

सहकारी तत्त्वावर शेतमालाची विक्री करण्याच्या पद्धतीच्या आणि सहकारी सोसायट्यांच्या विकासासाठी वाहतूक व्यवस्थेंत सुधारणा होणें अत्यंत महत्त्वाचे आहे. रेल्वेपुरतें बोलावयाचें तर मुंबई सारख्या शहरांतील बाजारांत शेतमाल नेण्याच्या दृष्टीनें वाहतुकींतील अडचणी दूर करण्याची गरज रेल्वेला पटवून देण्यांत आली आहे. रेल्वेनेंहि यास मान्यता दिली आहे. उदाहरणार्थ, गूळ उत्पादन केंद्रांत तुंबून राहिलेल्या गुळाची वाहतूक करण्यासाठी रेल्वेनें बऱ्याच वाघिणी पुरविण्याची तरतूद केली आहे.

सरकार जिल्हा लोकल बोर्डांना ग्रँट देत असल्यामुळें अधिक जोडरस्ते बांधण्याचें कामहि झपाट्यानें होत आहे. लोकलबोर्डांनीं त्यांच्या ठरविलेल्या कार्यक्रमानुसार रस्ते बांधणीचीं कामें हातीं घेतलीं आहेत. शिवाय, लोकांकडून वर्गणी घेऊन स्थानिक विकासाचीं जीं कामें हातीं घेण्यांत येतात त्यांत रस्त्यांचींहि कामें हातीं घेण्यांत येतात. निरनिराळ्या जिल्ह्यांच्या रस्त्यासंबंधींच्या कार्यक्रमांमध्यें ५०० अथवा त्याहून अधिक लोकवस्तीच्या गांवीं रस्ते बांधण्याच्या कामांची तरतूद करण्यांत आलेली आहे. या सर्व उपाययोजनांमुळें शेतमालाची विक्री करण्याच्या कार्यास प्रत्यक्ष मदत होते.

### बाजारभावाची माहिती

शेतमाल उत्पादकांना शेतमालाच्या आणि फळबागांतील मालाच्या दैनंदिन बाजारभावांचीहि माहिती पुरविण्यांत येते. भारतीय नभोवाणीच्या रूरल ब्रॉडकास्टिंग विभागातर्फे ही माहिती सर्व विभागांत सांगण्यांत येते व ती उपयुक्त ठरली आहे. अलिकडेच सुरू केलेल्या वर्गणीपद्धतीच्या योजनेखालीं आणखी रेडिओ बसविण्यांत येत असून त्यामुळें अधिकाधिक शेतकऱ्यांना घरबसल्या बाजारभाव कळतील. बाजारभाव वगैरे माहिती गोळा करण्यासाठी प्राईस सब कमिट्या स्थापन करण्याच्या बाबतींत मार्केट समित्यांनाहि साहाय्य करण्यांत येतें. शिवाय, बँकेबाबतच्या सोयींतहि वाढ करण्यांत आली असून मध्यवर्ती पैसा पुरविणाऱ्या संस्थांकडून या कमिट्यांना रु. २५,००० पर्यंतचीं कर्जे मिळूं शकतात.

## सहकारी चळवळीचा आढावा

### नफ्यांत मोठी घट : मार्केटिंग सोसायट्यांचे तोटे

१९५३–५४ मधील भारतांतील सहकारी चळवळीचा रिझर्व्ह बँकेनें घेतलेला आढावा प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून दिसून येतें कीं, सोसायट्यांची संख्या अहवालाचे वर्षी ४·८% नें वाढली आहे. सभासदांची संख्या १४२ लाखांवरून १५२ लाखांवर गेली आहे. प्रत्येक कुटुंबांत पांच माणसें आहेत, ह्या हिशेबानें, सहकाराचें लोण एकूण लोकसंख्येच्या एकपंचमांश लोकांपर्यंत पोंचलें आहे, असें गणित होतें. खेळतें भांडवल ३२७ कोटी रु. चें ३५१ कोटी रु. झालें आहे; म्हणजे त्यांत ७·५% वाढ दिसते. रिझर्व्ह बँकेनें पुरविलेलें कर्ज ६,८५,२९,००० रु. वरून ९,००,२३,५९० रु. पर्यंत वाढलें. सोसायट्यांकडील ठेवी १२४ कोटी रु.च्या १३२ कोटी रु. वर गेल्या, पण ही वाढ इतर मार्गांनीं होणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याच्या मानानें समाधानकारक नाहीं. १९५१–५२ मध्यें, ठेवींचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ३८·२% होतें, तें १९५३–५४ मध्यें उतरून ३७·५% झालें.

शेतकी पतपेढ्यांचा, सहकारी चळवळींत मुख्यतः भरणा आहे. अशा १,२६,९५४ सोसायट्या असून त्यांच्या पटावर ५८·४९ लक्ष सभासद आहेत. त्यांचें खेळतें भांडवल फक्त ५४·४१ कोटी रु. आहे. ह्याउलट, बिगर शेतकी सोसायट्यांची संख्या फक्त ८,३८९ असून त्यांचे २७·३८ लक्ष सभासद आहेत, पण त्यांचें खेळतें भांडवल ६९·८९ कोटी रु. आहे.

सहकारी मार्केटिंग सोसायट्यांना गेलीं दोन वर्षे फारच वाईट गेलीं. १९५१–५२ मध्यें सर्व सोसायट्यांनीं ५२० लक्ष रु. नफा दाखविला होता; १९५३–५४ मध्यें तो १६८ लक्ष रु. वर आला. त्याचें कारण बिगर क्रेडिट सोसायट्यांना १९५३–५४ मध्यें १२८ लक्ष रु. चा तोटा झाला; १९५१–५२ मध्यें त्यांना २२३ लक्ष रु. नफा झाला होता. सरकारी मदत व नियंत्रणें ह्यांच्या आधारापेक्षाहि अधिक मजबूत पाया आवश्यक आहे, असें ह्यावरून स्पष्ट होतें.

---

## मुंबई राज्यांत वजन-मापांच्या बाबतींत मेट्रिक पद्धति चालू होणार

### समितीची नेमणूक

मुंबई राज्यांत वजन–मापांच्या बाबतींत मेट्रिक पद्धति सुरू करण्यासाठी मुंबई सरकारनें डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, यांच्या अध्यक्षतेखाली १८ सभासदांच्या एका समितीची नेमणूक केली आहे.

सध्यांच्या फूट–पौंड पद्धतीऐवजीं मेट्रिक पद्धति अंमलांत आणल्यामुळें स्थायी मेट्रिक समितीनें ज्यांच्याकडे लक्ष दिलें पाहिजे अथवा भारत सरकारनें किंवा अन्य संस्थेनें उपाययोजना केली पाहिजे अशा कोणत्या अडचणी अथवा प्रश्न उत्पन्न होतील याचा विचार समितीनें करावयाचा आहे. त्याचप्रमाणें, कारखान्यांच्या बाबतींत या संधिकाळांत निर्माण होणाऱ्या सर्व तांत्रिक प्रश्नांचाहि विचार या समितीनें करावयाचा आहे.

जेव्हां नवीन यंत्रसामुग्री वगैरे मागविण्यांत येईल अथवा नवीन कारखाना वगैरे काढण्यांत येईल, त्यावेळीं ती यंत्रसामुग्री व तें साहित्य मेट्रिक पद्धतीवर आधारलेलें असेल अशी दक्षता समिति घेईल. तसेंच, विशेष गंभीर स्वरूपाच्या अडचणी निर्माण न होतां केवळ मेट्रिक पद्धति अथवा सध्यांच्या पद्धतीबरोबरच मेट्रिक पद्धतीहि तावडतोब सुरू करतां येईल किंवा काय, या प्रश्नाचाहि समिति विचार करील.

## सरकारच्या जमीनविषयक कायद्यांचा सहकारी बँकांवर परिणाम

### श्री. सरय्या ह्यांचा समयोचित इशारा

दि बॉंबे स्टेट को. बँकेची वार्षिक सभा दि. २४ सप्टेंबर रोजीं भरली होती. त्यावेळीं, बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत सरकारच्या कूळ कायद्याचा उल्लेख केला व त्यांतील तरतुदींचे सहकारी बँकांवर होणारे परिणाम स्पष्ट केले. "प्रस्तुत कायद्यानें, कुळानें किती किंमतीला जमीन-मालकाकडून जमीन विकत घ्यावी, ती किंमत ठरवून टाकली आहे. जमिनीच्या पुढील विक्रीवरहि नियंत्रणें व बंधनें घालण्यांत आलेलीं आहेत. शेतकऱ्याला सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठा व्हावा, हें भारत व राज्य सरकारांचें धोरण आहे. ज्या किंमतीला कूळ जमीन विकत घेऊं शकेल ती किंमत बाजारभावापेक्षा फारच कमी आहे आणि सहकारी संस्था शेतकऱ्याच्या कर्जमर्यादा ठरवितांना जमिनीचे बाजारभावच विचारांत घेत असतात. जमिनीच्या किंमती उतरल्या (खरें म्हणजे, जमिनीला खुला बाजार उरणारच नाहीं) म्हणजे कर्जाच्या मर्यादाहि आकुंचित होतील व शेतकऱ्याला दिलेल्या कर्जांत कांहीं बाबतींत बूड येईल. मुंबई राज्यापुरता विचार केला, तर शेतकऱ्यांच्या कर्जपुरवठ्याचें धोरण सरकारी मार्गदर्शनाखालींच आंखण्यांत आलेलें असून अंमलांत आहे. मुंबई सरकारनें स्टेट बँकेचे भाग खरेदी केले आहेत व तिच्या बोर्डावर सरकारचे तीन प्रतिनिधी आहेत. म्हणजे, राज्य सरकार स्टेट बँकेचें भागीदारच झालेले आहे. सरकारच्या इतर धोरणामुळें सहकारी संस्थांना नुकसान आलें, तर त्या नुकसानींतील आपला हिस्सा सरकारनें सोसला पाहिजे, हें युक्त आहे. जमीनविषयक व तत्सम ग्रामीण सुधारणांच्या कायद्यांमुळें ज्या अडचणी निर्माण होतील, त्याकारणानें सहकारी संस्थांना येणारा तोटा सरकार सोसील असें सरकारनें आश्वासन दिलें पाहिजे. ह्यापुढें कर्जमर्यादा कशी ठरवावी,: ह्याबाबत सरकारनें सहकारी बँकांना स्पष्ट मार्गदर्शन करावें व दिलेल्या कर्जांबाबत हमीहि द्यावी. लँडमार्गेज बँकांना तर ह्याची विशेषच जरूरी आहे."

---

### गजेंद्रगडकर अवार्डची मुदत

गजेंद्रगडकर बँक अवार्डला कायद्याचें स्वरूप देण्यांत आलें आहे. हा अवार्ड आतां ३१ मार्च, १९५९ अखेर अंमलांत राहील. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टानें एका वर्षाची मुदत सांगितलेली आहे. परंतु, बँक–नोकर तंटा १९४९ पासून चालू होता आणि तो मिटविण्यास इतका दीर्घ काळ लागला आहे कीं, त्याचा निवाडाहि कांहीं वर्षें अंमलांत रहाणें जरूर आहे.

---

**अहमदाबाद सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक**—३० जून, १९५५ रोजीं संपलेल्या वर्षांत अहमदाबाद सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेनें चांगली प्रगति केलेली दिसते. सभासदांची संख्या १९५४ सालीं ५०० होती; आतां ती ६२२ झाली आहे. भांडवल ६,०७,७०० रु. होतें तें आतां ७,०२,१०० रु. झालें आहे. नफा ७८,५२७ रुपयां-पासून १,२८,१२४ रुपयांपर्यंत वाढला आहे. बँकेच्या शाखांची संख्या ४ होती ती ५ झाली आहे.

**मुंबई राज्यांत अधिक अपघात**—१९५४ सालीं मुंबई राज्यांत रस्त्यावरील अपघात सर्वांत अधिक झाले. रस्त्यावरील अपघातांची एकूण संख्या ५,७४५ आहे. त्यापैकी २६८ अपघात प्राणांतिक ठरले. मद्रास राज्यांतील हेच आंकडे ४,२५७ व २४५ असे आहेत. मद्रासचा अनुक्रम मुंबई राज्याच्या खालोखाल लागतो.

## बॉंबे स्टेट को. बँक लि.

चेअरमन : आर. जी. सरय्या, ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर : व्ही. पी. वर्दे, मॅनेजर : वाय. बी. गायतोंडे.

वरील बँकेस अहवालाचे वर्षीं ३,९०,८२९ रु. नफा झाला. भागांवर ४% करमाफ डिव्हिडंड वांटण्यांत येईल.

बँकेकडील ठेवींत १८१ लक्ष रुपयांची वाढ होऊन, त्यांची रक्कम १०७९ लक्ष रुपये झाली. सोसायट्या व व्यक्ती ह्या दोघांच्याहि ठेवींत वाढ झाली आहे.

अहवालाचे वर्षी शेतकीच्या मालाचे बाजारभाव बरेच उतरल्यामुळें कर्जदारांची परतफेडीची शक्ति कमी झाली. सहकारी सोसायट्यांना दिलेल्या शेतकी कर्जांत २३ लाखांची वाढ झाली, तरी नोंदलेल्या सोसायट्यांच्या संख्येच्या प्रमाणांत ती झालेली नाहीं. मध्यवर्ती बँकांनीं स्टेट बँकेकडून ५० लाखांनीं कर्जें कमी उचललीं. बिगर–क्रेडिट व अर्बन सोसायट्यांना दिलेलीं कर्जेंहि १७ लाखांनीं उतरलीं. सहकारी सोसायट्यांना दिलेल्या एकूण कर्जांचा आकडा ४५० लक्ष रुपये, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा ४२ लाखांनीं कमी होता.

शेतमालाचे तारणावर वैयक्तिक सभासदांना द्यावयाचीं कर्जें फक्त जुन्या गिर्‍हाइकांनाच द्यावयाचें बोर्डाचें धोरण आहे. त्यांची रक्कम गेल्या वर्षापेक्षा २५ लक्ष रुपयांनीं कमी होऊन ती ३१ लाखांवर आली.

ह्या कारणांमुळें इतर बँकांकडील ठेवी व सरकारी रोख्यांतील गुंतवणूक ह्यांतील रकमांत पुष्कळच वाढ झाली; एकूण ठेवींशीं त्यांचें प्रमाण ६६·६% पडलें. जिल्हा बँकांच्या स्थापनेस प्रोत्साहन देऊन त्यांचेकडे राज्य बँकेच्या शाखा वर्ग करण्याचें धोरण चालू आहे. गिरणी कामगारांच्या सोसायट्यांच्या सोईसाठी लालबाग ( मुंबई ) येथें एक शाखा उघडण्यांत आली. अजरा ( कोल्हापूर ), जामखेड ( अहमदाबाद ) आणि अलिबाग ( कुलाबा ) येथेंहि शाखा सुरू करण्यांत आल्या.

ठेवींत वाढ, कर्जांत घट, ह्यामुळें बरीच रक्कम कमी व्याजानें गुंतवावी लागली. त्या कारणानें नफा कमी झाला. ४% डिव्हिडंडचा दर कायम आहे.

---

**समाज–हितवर्धक केंद्र**—सोलापूर येथील सोशल वेल्फेअर सेंटरसाठी ४०,००० रुपये खर्चून खास इमारत बांधण्यांत आली आहे. सोलापूर मिल कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. गोकुळचंद मोरारका, ह्यांनीं आपल्या खर्चानें इमारत बांधून दिली आहे. संस्थेला लागणाऱ्या इतर सामान–सुमानासाठीं त्यांनीं आणखी १५,००० रुपयांची देणगी देण्याचें कबूल केलें आहे.

**हवेंतील पोकळीचा तडाखा**—न्यूयॉर्कहून लंडनला जाणारें एक विमान हवेंतील निर्वात पोकळीमुळें एकदम ७०० फूट खालीं आलें. अमेरिकेंतील ७२ मजल्याच्या इमारतइतकी ही उंची आहे. ही घसरगुंडी झाली त्यावेळीं प्रवाशांना जेवण वाढण्यांत येत होतें. सर्व प्रवासी विमानांतच इतस्ततः फेकले गेलें. नंतर त्यांना पुन्हां जेवण देण्यांत आलें.

**ब्रिटनचा विजेचा पुरवठा**—ब्रिटनमधील सध्यांचीं विजेच्या पुरवठ्याचीं केंद्रें आणि पुढें निघणारीं अणुशक्तिजन्य वीज–केंद्रें फ्रान्स व युरोपांतील इतर वीजनिर्मिति केंद्रांना जोडलीं जाण्याचा संभव आहे. इंग्लिश खाडीखालून वीजवाहक तार टाकून अशा प्रकारचे प्रयोग चालू करण्यांत आले आहेत.

WILICO

**कालाबरोबर प्रगतिपथावर असलेल्या वेस्टर्न इंडियाची विमा पॉलिसी**

—म्हणजेच—

**जीवनाची सुरक्षितता**

★ १९५४ चे कांहीं बोलके आंकडे ★

| | |
|---|---|
| एकूण नवीन काम .... | रु. ४ कोटीवर |
| एकूण हप्त्याची आवक .... | रु. १ कोटीवर |
| एकूण आयुर्निधि .... | रु. ६ कोटीवर |
| एकूण क्लेम्स दिले .... | रु. २॥ कोटीवर |

—बोनस दरसाल दर हजारी—

रु. १२ व रु. १५

हयातींतील विमा हयातीनंतरचा विमा

**वेस्टर्न इंडिया**

**विमा कंपनी लिमिटेड, सातारा.**

पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.

—फोन नं. ३४०१—

**बँक ऑफ पूना लि.**

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल | रु. १२,५०,००० |

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा :—(१) सदाशिव पेठ, पुणें १
(२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.